# मेट्रो ३ : पाचवे भुयार खणण्यात यश

**मुंबई** : कुलाबा-वांद्रे-सिप्झ या तिसऱ्या संपूर्णतः भुयारी मेट्रो मार्गिकेदरम्यानचे पाचवे भुयार खणण्यात यश आले असून, बुधवारी सायंकाळी ४ च्या सुमारास या भुयारातून टीबीएम बाहेर येणार आहे. कुलाबा-वांद्रे-सिप्झ या तिसऱ्या मेट्रो मार्गिकेच्या कामाकाजाच्या सुलभीकरणासाठी



पॅकेजनुसार विभागणी करण्यात आली आहे. बुधवारी छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ टी २ टर्मिनल या पॅकेज ७ मधील भुयाराचे ब्रेक थ्रू पार पडणार आहे. यापूर्वी मेट्रो रेल कॉर्पोरेशनने सिप्झ व आंतरराष्ट्रीय विमानतळ या दोन ठिकाणी भूयारीकरण पूर्ण केले आहे, तर ३१ जानेवारी रोजी नुकतेच माहीम नयानगर येथे कृष्णा १ व कृष्णा २ या दोन टीबीएम मशीन एकत्रितरित्या बाहेर पडल्याने वैशिष्ट्यपूर्ण बाब असल्याचे एमएमआरसीएलने स्पष्ट केले होते. सध्या सर्व १७ टीबीएम्स मुंबईच्या भूगर्भात काम करत असून, सध्या ३३.५ किमी मार्गापैकी १८ किमीपेक्षा अधिक ३५ टक्के भुयारीकरण पूर्ण करण्यात आले आहे.